**"महाराष्ट्र पर्यटन धोरण-२०१६"** अंतर्गत महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या मालकीच्या असलेल्या व महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाकडूनच चालविण्यात येणाऱ्या सर्व पर्यटन प्रकल्पांना **अकृषिक कराच्या आकारणीतून** संपूर्ण सूट देणेबाबत.

# महराष्ट्र शासन

## महसूल व वन विभाग

## शासन निर्णय क्र. ईएनटी-२०१६/प्र.क्र.१०८/टी-१

मंत्रालय, मुंबई- ४० ००३२

दिनांक- ३० सप्टेंबर, २०१६.

**<u>संदर्भ</u>:-**१. शासन निर्णय, गृह विभाग (पर्यटन), क्र. एमटीसी-१०९१/प्र.क्र.४०९/ पर्यटन, दि. ३०.११.१९९३.

२. शासन निर्णय, गृह विभाग (पर्यटन), क्र. एमटीसी-०३९९/प्र.क्र.२०१/ पर्यटन, दि. ०७.०४.१९९९.

३. शासन निर्णय, गृह विभाग (पर्यटन), क्र. एमटीसी-०३९९/प्र.क्र.१४२/ पर्यटन, दि. ०८.०७.१९९९.

४. शासन निर्णय, गृह विभाग (पर्यटन), क्र. एमटीसी-२०००/३/प्र.क्र.२४२/ पर्यटन, दि. ३१.०७.२०००.

५. शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग, क्र. एनएपी-१००२/प्र.क्र.२१६/ल ९. दि. ५.१२.२००५.

६. शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र.एनएए-१००७/प्र.क्र.३८/ल-५, दि.१६.१२.२०११.

७. शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, क्र.टीडीएस-२०१५/११/प्र.क्र.-१०२१/ पर्यटन,दि.०४.०५.२०१६.

**प्रस्तावना:-**

राज्यातील पर्यटन उद्योगाला गती देण्याच्या दृष्टीने संदर्भाधीन क्र.७ वरील शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, क्र.टीडीएस-२०१५/११/सीआर-१०२१/टुरिझम, दि.०४.०५.२०१६ अन्वये **"महाराष्ट्र पर्यटन धोरण-२०१६"** जाहीर करण्यात आलेले असून सदर धोरणांतर्गत **महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या मालकीच्या सर्व पर्यटन प्रकल्पांना** संदर्भाधीन क्र.६ वरील शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र. एनएए -१००७/प्र.क्र.३८/ल-५, दि.१६.१२.२०११ अन्वये देण्यात येणारी अकृषिक कराच्या आकारणीमधील संपूर्ण सूट पुढे चालू ठेवण्याबाबत तरतूद करण्यात आली आहे.

त्यानुसार, ***महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या मालकीच्या असलेल्या सर्व पर्यटन प्रकल्पांना, "महाराष्ट्र पर्यटन धोरण-२०१६"*** मधील अटी व शर्तींच्या पुर्ततेच्या अधीन राहून, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील तरतुदींन्वये शासनास देय होणाऱ्या अकृषिक कराच्या आकारणीमधील संपूर्ण सूट देण्यासंदर्भात सुस्पष्ट आदेश निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

राज्यातील पर्यटन उद्योगाला प्रोत्साहन देण्याच्या प्रयोजनासाठी पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाने संदर्भाधीन क्र. ७ वरील दि.०४.०५.२०१६ च्या शासन निर्णयान्वये जाहीर केलेल्या **"महाराष्ट्र पर्यटन धोरण-२०१६" मधील *"विविध पर्यटन घटकांना आर्थिक प्रोत्साहने"*** या शिर्षाखाली नमूद करण्यात आलेल्या तरतूदींच्या अनुषंगाने ***महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या मालकीच्या असलेल्या सर्व पर्यटन प्रकल्पांना*** महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील तरतुदींन्वये शासनास देय होणाऱ्या अकृषिक कराच्या आकारणीमधील संपूर्ण सूट ही महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या **कलम ७८, कलम ६४** आणि **कलम ११७ (५)** मधील तरतूदींनुसार तसेच **"महाराष्ट्र पर्यटन धोरण-२०१६"** या धोरणान्वये विहित करण्यात आलेल्या अटींच्या / शर्तींच्या अधीन राहून, अनुज्ञेय करण्यात येत आहे.

०२. *"महाराष्ट्र पर्यटन धोरण-२०१६" मधील तरतुदींनुसार महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या मालकीच्या असलेल्या सर्व पात्र पर्यटन प्रकल्पांना महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील तरतूदींन्वये अकृषिक कराच्या आकारणीमधून सवलत देतांना खालीलप्रमाणे कार्यपध्दत अवलंबविण्यात यावी. :-*

(१) "महाराष्ट्र पर्यटन धोरण-२०१६" अंतर्गत अनुज्ञेय सवलतींचा लाभ घेण्यास महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांनी त्यांच्या मालकीच्या पर्यटन प्रकल्पांची पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या अंतर्गत नव्याने निर्माण करण्यात आलेल्या **पर्यटन संचालनालयाकडे नोंदणी** करुन घेणे अनिवार्य राहील.

(२) **"महाराष्ट्र पर्यटन धोरण-२०१६"** मधील **"आर्थिक प्रोत्साहने"** या शिर्षाखाली नमूद तरतुदींनुसार अकृषिक कराच्या आकारणीमधील सवलत देण्यासाठी पर्यटन संचालनालयामार्फत महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या मालकीच्या अशा पात्र नोंदणीकृत पर्यटन प्रकल्पांना **पात्रता प्रमाणपत्र (Eligibility Certificate)** देण्यात यावे.

(३) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या **कलम ७८, कलम ६४** आणि **कलम ११७ (५)** मधील तरतुदींनूसार **अकृषिक कराच्या** आकारणी संदर्भातील अधिकार हे महसूल व वन विभागाच्या अखत्यारीत येणाऱ्या संबंधित विहीत महसूली प्राधिकाऱ्यास असल्यामुळे **"महाराष्ट्र पर्यटन धोरण-२०१६"** मध्ये नमुद करण्यात आलेल्या तरतुदींच्या अनुषंगाने पर्यटन संचालनालयाकडून वरीलप्रमाणे पात्रता प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील अनुषंगिक तरतुदींनूसार, संबंधित जिल्हाधिकाऱ्यांमार्फत महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या मालकीच्या अशा पर्यटन प्रकल्पांना प्रकरणपरत्वे **अकृषिक कराच्या** आकारणीमधील सवलती प्रदान करण्याचे आदेश निर्गमित करण्यात यावेत.

पर्यटन संचालनालयाने निर्गमित केलेले **"पात्रता प्रमाणपत्र"** (Eligibility Certificate) जिल्हाधिकारी यांना प्राप्त झाल्यानंतर संबंधित जिल्हाधिकारी यांनी **जास्तीत जास्त १ महिन्याच्या** कालावधीमध्ये महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या मालकीच्या संबंधित प्रकल्पांसाठी अकृषिक आकारणीतून सुट देण्यासंबंधी आदेश निर्गमित करणे अनिवार्य राहील.

(४) **"महाराष्ट्र पर्यटन धोरण-२०१६"** मध्ये नमुद करण्यात आलेल्या इतर सर्व **अटी व शर्ती** सध्याच्या स्वरूपात कायम राहतील आणि त्यांचे **संनियंत्रण हे पर्यटन संचालनालय, महाराष्ट्र शासन** यांचे कडून करण्यात येईल.

०३. सदरहू शासन निर्णय हा शासनाच्या www.maharashtra.gov.in. या संकेतस्थळावर प्रसिध्द केला असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०१६०९३०१०२९१०४७१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Madhav Vitthal Veer

Digitally signed by Madhav Vitthal Veer
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=3c0e93ab89479096722887 5f0b4fd8c2fda859 0b77ae2ea700bf19e91a673afc, cn=Madhav Vitthal Veer
Date: 2016.09.30 16:42:20 +05'30'

**(डॉ. माधव वीर)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत :-

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, मुंबई.

२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई -३२.
३. मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
४. मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
५. मा.विधानसभा व विधानपरिषद सदस्य (सर्व)
६. मा. मुख्य सचिव यांचे उपसचिव, मंत्रालय, मुंबई -३२ .
७. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई (५ प्रती)
८. विभागीय आयुक्त (सर्व)
९. जिल्हाधिकारी (सर्व)
१०.महालेखापाल (लेखा परिक्षा / लेखा व अनुज्ञेयता) १/२, महाराष्ट्र राज्य , मुंबई/नागपूर
११.प्रधान सचिव (महसूल) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई -३२
१२.सह सचिव/उपसचिव (सर्व) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
१३.सर्व अवरसचिव/ कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग
१४.निवड नस्ती/ टी-१.

**"महाराष्ट्र पर्यटन धोरण-२०१६"** मधील तरतुदींच्या अनुषंगाने पात्र पर्यटन प्रकल्पांना **महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियमातील** तरतुदींन्वये परिमंडळनिहाय देय होणाऱ्या करमणूक शुल्काच्या आकारणीतून सवलत प्रदान करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक: ईएनटी-२०१६/प्र.क्र.१०८/टी-१**
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ३० सप्टेंबर, २०१६

**वाचा**:- शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, क्र.टीडीएस-२०१५/११/सीआर-१०२१/टुरिझम, दि.०४.०५.२०१६.

**प्रस्तावना :-**

राज्यातील पर्यटन उद्योगाला गती देण्याच्या दृष्टीने संदर्भाधीन शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, क्र.टीडीएस-२०१५/११/सीआर-१०२१/टुरिझम, दि.०४.०५.२०१६ अन्वये **"महाराष्ट्र पर्यटन धोरण-२०१६"** जाहीर करण्यात आलेले असून त्याअंतर्गत राज्याची खालीलप्रमाणे क्षेत्रनिहाय विविध परिमंडळात विभागणी करून विविध परिमंडळांकरीता **पात्रता कालावधी (Eligibility Period)** निश्चित करून संबंधित परिमंडळांमधील पात्र पर्यटन प्रकल्पांना त्या-त्या पात्रता कालावधीकरीता विविध सवलती देण्यासंदर्भात तरतूद करण्यात आली आहे.

| अ. क्र. | प्रकल्प प्रकार *(Type of Units)* | परिमंडळ वर्गीकरण *(Zone Classification)* | *ठेव भांडवली गुंतवणूक (Fixed Capital Investment) (रूपये कोटी)* | *प्रत्यक्ष रोजगार निर्मिती (Direct Employment Generation)* | *गुंतवणूक कालमर्यादा (Time Period for Investment) (महिने)* | परिमंडळातील क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | *मेगा प्रकल्प घटक* (Mega Project Unit) | *अ* | १०० | ३०० | ६० | मुंबई, मुंबई उपनगर जिल्हा, नवी मुंबई, ठाणे व पुणे महानगर पालिका व पिंपरी-चिंचवड महानगर पालिका क्षेत्र. |
| | | *ब* | ५० | १५० | ४८ | परिमंडळ "अ" मध्ये असलेल्या महानगरपालिकांची क्षेत्रे आणि सिंधुदूर्ग, औरंगाबाद आणि नागपूर हे विशेष पर्यटन जिल्हे वगळून सर्व महानगरपालिका आणि "अ" वर्ग नगरपालिकांची क्षेत्रे. |
| | | *क* | २५ | ७५ | ४८ | परिमंडळ अ, ब व विशेष पर्यटन जिल्ह्यांची ची क्षेत्रे वगळून महाराष्ट्रातील सर्व जिल्हे. |
| | | *विशेष पर्यटन क्षेत्र (S.T.Z.) / विशेष पर्यटन जिल्हे (S.T.D.)* | १५ | ४५ | ३६ | सिंधुदूर्ग, औरंगाबाद आणि नागपूर जिल्हे. |
| २ | *अल्ट्रा मेगा प्रकल्प घटक* (Ultra Mega Project Unit) | *संपूर्ण राज्य* | ५०० | ७५० | ८४ | पर्यटन विभागाने निश्चित केलेली उच्च क्षमता असलेली क्षेत्रे. |

*"महाराष्ट्र पर्यटन धोरण-२०१६"* मध्ये विविध परिमंडळांमधील पात्र पर्यटन प्रकल्पांना पात्रता कालावधीकरीता सदर धोरणामधील अटी व शर्तींच्या पुर्ततेच्या अधीन राहून, महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियमातील तरतुदींन्वये शासनास देय होणाऱ्या करमणूक शुल्काच्या आकारणीमधील सूट देण्याचे ही संकल्पित आहे. त्यानुषंगाने सुस्पष्ट आदेश निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या संदर्भाधीन दि.०४.०५.२०१६ च्या शासन निर्णयान्वये जाहीर करण्यात आलेल्या *"महाराष्ट्र पर्यटन धोरण-२०१६"* मधील *"विविध पर्यटन घटकांना आर्थिक प्रोत्साहने"* या शिर्षाखाली नमूद करण्यात आलेल्या तरतूदींच्या अनुषंगाने खालील तक्त्यात दर्शविण्यात आल्याप्रमाणे विविध परिमंडळांमधील पात्र पर्यटन घटकांना, त्यांच्यासमोर दर्शविलेल्या **पात्रता कालावधीकरीता महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियमातील तरतुदींन्वये शासनास देय करमणूक शुल्काच्या आकारणीमधील सवलत, सदर धोरणान्वये विहीत करण्यात आलेल्या नियमांचे / अटींचे पालन करण्याच्या अधिन राहुन, अनुज्ञेय राहील. :-**

| *अ. क्र.* | *प्रकल्प प्रकार* | *परिमंडळ प्रकार* | *पात्रता कालावधी (वर्षे)* | *करमणूक शुल्क आकारणीमधील सूट (%)* | *करमणूक शुल्क आकारणीमधील सवलतीचा कालावधी (वर्षे)* |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | मेगा प्रकल्प (Mega Project Units ) *(तक्ता क्र. ३ नुसार)* | अ | १० | ५०% | १० |
| | | ब | १० | ७५% | १० |
| | | क | १५ | १००% | १५ |
| | | विशेष पर्यटन क्षेत्र (S.T.Z.) / विशेष पर्यटन जिल्हे (S.T.D.) | १५ | १००% | १५ |
| २ | अल्ट्रा मेगा प्रकल्प (Ultra Mega Project Units) *(तक्ता क्र. ३ नुसार)* | संपूर्ण राज्य | २० | १००% | २० |
| ३ | मोठे प्रकल्प (Large Projects) *(तक्ता क्र. ४ नुसार)* | अ | ०७ | ५०% | ०७ |
| | | ब | ०७ | ७५% | ०७ |
| | | क | १० | १००% | १० |
| | | विशेष पर्यटन क्षेत्र (S.T.Z.) / विशेष पर्यटन जिल्हे (S.T.D.) | १० | १००% | १० |
| ४ | MSME प्रकल्प ( MSME Projects) *(तक्ता क्र. ५ नुसार)* | अ | ०५ | ५०% | ०५ |
| | | ब | ०५ | ७५% | ०५ |
| | | क | ०७ | १००% | ०७ |
| | | विशेष पर्यटन क्षेत्र (S.T.Z.)/ विशेष पर्यटन जिल्हे ((S.T.D.) | ०७ | १००% | ०७ |

२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई -३२.
३. मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
४. मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
५. मा.विधानसभा व विधानपरिषद सदस्य (सर्व)
६. मा. मुख्य सचिव यांचे उपसचिव, मंत्रालय, मुंबई -३२ .
७. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई (५ प्रती)
८. विभागीय आयुक्त (सर्व)
९. जिल्हाधिकारी (सर्व)
१०.महालेखापाल (लेखा परिक्षा / लेखा व अनुज्ञेयता) १/२, महाराष्ट्र राज्य , मुंबई/नागपूर
११.प्रधान सचिव (महसूल) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई -३२
१२.सह सचिव/उपसचिव (सर्व) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
१३.सर्व अवरसचिव/ कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग
१४.निवड नस्ती/ टी-१.

RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष २, अंक १३९] बुधवार, नोव्हेंबर २, २०१६/कार्तिक ११, शके १९३८ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक २७७**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### महसूल व वन विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २९ ऑक्टोबर २०१६

**आदेश**

**महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम.**

क्रमांक मुद्रांक-२०१६/४३६/अनौ.०७/प्र.क्र.१२८/म-१.–महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम (१९५८ चा ६०) च्या कलम ९ च्या खंड (अ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून लोकहितास्तव तसे करणे आवश्यक असल्याबद्दल महाराष्ट्र शासनाची खात्री पटल्याने महाराष्ट्र शासन याद्वारे शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, क्रमांक टीडीएस. २०१५/११/सीआर-१०२१/पर्यटन, दिनांक ४ मे २०१६ अन्वये व्याख्या केलेले व मान्यता दिलेले नवीन पर्यटन युनिट सुरू करण्याच्या संबंधात किंवा विद्यमान पर्यटन युनिटाच्या विस्तार करण्याच्या संबधात निष्पादित केलेल्या पहिल्या जमीन अभिहस्तांतरण संलेखावर " उक्त " अधिनियमासोबत जोडलेल्या अनुसूची-एक च्या अनुच्छेद २५ च्या खंड (ख) अन्वये आकारणीयोग्य असलेले मुद्रांक शुल्क दिनांक १ एप्रिल २०१६ पासून सुरू होणाऱ्या व दिनांक ३१ मार्च २०२६ रोजी संपणाऱ्या (दोन्ही दिवस धरून) किंवा सदर योजना अस्तित्वात असेपर्यंत या कालावधीसाठी, खाली दर्शविलेल्या क्षेत्रांसाठी व सोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या त्या त्या क्षेत्रासमोर दर्शविलेल्या मर्यादेपर्यंत पुढील शर्तीच्या अधीन राहून कमी/माफ करीत आहे :–

शर्त.—ज्या संलेखावर मुद्रांक शुल्क कमी/माफ केले असेल त्या संलेखाच्या दिनांकापासून तीन वर्षाच्या कालावधीच्या आत काम सुरू करण्यात कसूर करणारे किंवा महाराष्ट्र पर्यटन धोरण, २०१६ च्या कोणत्याही शर्तीचे उल्लंघन करणारे कोणतेही युनिट जणू काही सुरूवातीपासूनच मुद्रांक शुल्क कमी केले नसल्याप्रमाणे, संपूर्ण मुद्रांक शुल्क व शास्ती कोणतीही असल्यास भरण्यास पात्र ठरेल. सदर अटीचे पालन करण्याचे व त्याप्रमाणे तिमाही अहवाल महसूल व वन विभागाला विनाविलंब सादर करण्याची संपूर्ण जबाबदारी ही लाभार्थी विभाग म्हणून पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन यांची राहील.

**स्पष्टीकरण.**—या आदेशाच्या प्रयोजनार्थ, नवीन पर्यटन युनिट किंवा विद्यमान पर्यटन युनिटाचा विस्तार याचा अर्थ महाराष्ट्र पर्यटन धोरण, २०१६ अन्वये महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ मर्यादित यांनी असे युनिट म्हणून प्रमाणित केलेले पर्यटन युनिट असा आहे.

## अनुसूची - १

| अ. क्र. | परिमंडळ | क्षेत्राचे वर्णन | मुद्रांक शुल्कातील घट/मर्यादा | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | बृहत/अतिबृहत प्रकल्प | मोठे प्रकल्प | एमएसएमई प्रकल्प |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १ | अ | मुंबई, मुंबई उपनगर जिल्हा, नवीन मुंबई, ठाणे, पुणे आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्र. | ५०% | ५०% | ५०% |
| २ | ब | सर्व महानगरपालिका (परिमंडळ अ आणि विशेष पर्यटन जिल्हे मधील क्षेत्राव्यतिरिक्त आणि अ वर्ग नगरपालिका वगळून). | ७५% | ७५% | ७५% |
| ३ | क | परिमंडळ अ आणि ब व विशेष पर्यटन जिल्ह्यामधील क्षेत्राखेरीज महाराष्ट्रातील सर्व जिल्हे. | १००% | १००% | १००% |
| ४ | विशेष पर्यटन जिल्हे. | सिंधुदुर्ग, औरंगाबाद व नागपूर जिल्हे | १००% | १००% | १००% |
| ५ | विशेष पर्यटन क्षेत्र. | पर्यटन विभागाकडून उच्च क्षमता असलेल्या क्षेत्रांना बिंदूने चिन्हांकित करणे. | १००% | १००% | १००% |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**डॉ. मालिनी वि. शंकर,**
शासनाचे अपर मुख्य सचिव.

## REVENUE AND FOREST DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated 29th October 2016

### Order

MAHARASHTRA STAMP ACT.

No. Mudrank-2016/436/CR-128/UOR. No. 07/M-1.—In exercise of the powers conferred by clause (a) of section 9 of the Maharashtra Stamp Act (LX of 1958), the Government of Maharashtra after being satisfied that it is necessary to do so in the public interest, hereby remits or reduces the stamp duty chargeable under clause (b) of article 25 of the Schedule I appended to the said Act on the instrument of first Conveyance of land executed in relation to starting of a New Tourism Unit or expansion of an Existing Unit as defined and approved under the Maharashtra Tourism Policy-2016 declared by the the Government of Maharashtra *vide* the Government Resolution, Tourism and Cultural Affairs Department, No. TDS-2015/11/C. R. 1021/Tourism, dated the 4th May 2016, in the Zones specified in column (2) of the Schedule appended hereto comprising an area specified in column (3) thereof to the extent specified in column (4) thereof, during the period of ten years commencing from the 1st April 2016 and ending on 31st March 2026 (inclusive of both days) or till the said Tourism Policy is in force, subject to the condition that in case the eligible unit fails to start the activities within the period of three years from the date of instrument for which the remission or reduction in stamp duty is granted or commits breach of any of the conditions specified in the Maharashtra Tourism Policy-2016, it shall be liable to pay the whole of the stamp duty and penalty, if any, as if there was no remission or reduction from the beginning. As a beneficiary department, the Tourism and Cultural Affairs Department of Government of Maharashtra will be responsible for monitoring and submiting the quarterly report to the Revenue and Forest Department regarding compliance with the said condition.

*Explanation.*— For the purpose of this order, "New Tourism Unit" or "Expansion of an existing Unit" shall mean the Tourism Unit which is so certified to be such unit by the Maharashtra Tourism Development Corporation Limited, under the Tourism Policy of Maharashtra 2016.

*Schedule-I*

| Sr. No. | Zone | Description of the Areas | Extent of reduction of Stamp Duty | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | Mega/Ultra Projects | Large Projects | MSME Projects |
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) |
| 1 | 'A' | Mumbai, Mumbai Suburban District, Navi Mumbai, Thane, Pune and Pimpri-Chinchwad Municipal Corporation areas. | 50% | 50% | 50% |
| 2 | 'B' | All Municipal Corporations (except areas in Zone 'A' areas, Special Tourism Districts and A class Municipalties). | 75% | 75% | 75% |

*Schedule-I–Contd.*

| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) |
|---|---|---|---|---|---|
| 3 | 'C' | All Districts of Maharashtra except areas in Zone 'A' and 'B' and Special Tourism Districts. | 100% | 100% | 100% |
| 4 | Special Tourism Districts (STD). | Districts of Sindhudurg, Aurangabad and Nagpur. | 100% | 100% | 100% |
| 5 | Special Tourism Zones (STZ). | High Potential Zones to be earmarked by DoT. | 100% | 100% | 100% |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

DR. MALINI V. SHANKAR,
Additional Chief Secretary
to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ३, अंक ४(२)| शुक्रवार, जानेवारी ६, २०१७/पौष १६, शके १९३८ |पृष्ठे ५, किंमत : रुपये ९.००

### असाधारण क्रमांक ९

### प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

### उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

तिसरा मजला, मुख्य इमारत, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ६ जानेवारी २०१७

अधिसूचना

**महाराष्ट्र विद्युत शुल्क अधिनियम, २०१६.**

क्रमांक इएलडी २०१६/प्र.क्र.१६/ऊर्जा-१.—ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, क्रमांक टीडीएस.२०१५/११/प्र.क्र.१०२१/पर्यटन, दिनांक ४ मे २०१६ अन्वये महाराष्ट्राचे पर्यटन धोरण, २०१६ जाहीर केले आहे (यात यापुढे जिचा उल्लेख " उक्त पर्यटन धोरण " असा करण्यात आला आहे) आणि महाराष्ट्र शासनाने उक्त पर्यटन धोरणातील परिच्छेद ५.६.१३ मध्ये नमूद केलेल्या युनिटांना उक्त पर्यटन धोरणानुसार विशिष्ट प्रोत्साहने जाहीर केली आहेत ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने सार्वजनिक हितासाठी उक्त पर्यटन धोरणाअंतर्गत जाहीर केलेल्या नवीन प्रोत्साहन योजनेनुसार पर्यटन उपक्रम असलेल्या पात्र प्रकल्पांनी वापरलेल्या ऊर्जेवरील महाराष्ट्र विद्युत शुल्क अधिनियम, २०१६ (२०१६ चा २६) अधिनियमाच्या अनुसूची " क " मधील भाग " ख " अन्वये देय असलेले विद्युत शुल्क भरण्यातून सूट देणे इष्ट आहे.

आता, त्याअर्थी, महाराष्ट्र विद्युत शुल्क अधिनियम, २०१६ च्या कलम ४ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन याद्वारे सोबत जोडलेल्या तक्त्यातील स्तंभ २ मध्ये पर्यटन धोरणातील क्षेत्रनिहाय वर्गवारीप्रमाणे उल्लेख केलेल्या घटकांना, उक्त पर्यटन धोरणाअंतर्गत क्षेत्रनिहाय अंतर्भूत पात्र घटकांकडून वापरलेल्या वीजेवर, उक्त अधिनियमाच्या अनुसूची " क " मधील भाग " ख " अन्वये देय असलेले विद्युत शुल्क भरण्यातून, तक्त्यातील स्तंभ ३ व स्तंभ ४ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या टक्केवारी व कालावधीसाठी सूट देण्यात येत आहे.

## तक्ता-१

## विशाल/अतिविशाल प्रकल्प

| अ. क्र. (१) | वर्गवारी व क्षेत्र (२) | विद्युत शुल्क सूट टक्केवारी (३) | सक्षम कालावधी (वर्ष) (४) |
|---|---|---|---|
| १ | **अ**-मुंबई, मुंबई उपनगर जिल्हा, नवी मुंबई, ठाणे व पुणे महानगरपालिका आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्र. | ५० टक्के | १० |
| २ | **ब**-इतर सर्व महानगरपालिका (वरील अनुक्रमांक १ मधील नोंदीत समाविष्ट असलेले क्षेत्र वगळून आणि सिंधुदुर्ग, औरंगाबाद व नागपूर हे विशेष पर्यटन जिल्हे आणि विशेष पर्यटन विभाग) आणि ' अ ' वर्ग महानगरपालिका. | ७५ टक्के | १० |
| ३ | **क**-महाराष्ट्रातील सर्व जिल्हे (वरील अनुक्रमांक १ व २ मधील नोंदीत समाविष्ट असलेले क्षेत्र वगळून) आणि विशेष पर्यटन जिल्हे. | १०० टक्के | १५ |
| ४ | **विशेष पर्यटन क्षेत्र/विशेष पर्यटन जिल्हे**-सिंधुदुर्ग, औरंगाबाद व नागपूर हे जिल्हे तसेच पर्यटन विभाग निश्चित करेल ती क्षेत्रे. | १०० टक्के | १५ |
| ५ | अतिविशाल प्रकल्प | १०० टक्के | २० |

## तक्ता-२

## मोठे प्रकल्प

| अ. क्र. (१) | वर्गवारी व क्षेत्र (२) | विद्युत शुल्क सूट टक्केवारी (३) | सक्षम कालावधी (वर्ष) (४) |
|---|---|---|---|
| १ | **अ**-मुंबई, मुंबई उपनगर जिल्हा, नवी मुंबई, ठाणे व पुणे महानगरपालिका आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्र. | ५० टक्के | ७ |
| २ | **ब**-इतर सर्व महानगरपालिका (वरील अनुक्रमांक १ मधील नोंदीत समाविष्ट असलेले क्षेत्र वगळून आणि सिंधुदुर्ग, औरंगाबाद व नागपूर हे विशेष पर्यटन जिल्हे आणि विशेष पर्यटन विभाग) आणि ' अ ' वर्ग महानगरपालिका. | ७५ टक्के | ७ |
| ३ | **क**-महाराष्ट्रातील सर्व जिल्हे (वरील अनुक्रमांक १ व २ मधील नोंदीत समाविष्ट असलेले क्षेत्र वगळून) आणि विशेष पर्यटन जिल्हे. | १०० टक्के | १० |
| ४ | **विशेष पर्यटन क्षेत्र/विशेष पर्यटन जिल्हे**-सिंधुदुर्ग, औरंगाबाद व नागपूर हे जिल्हे तसेच पर्यटन विभाग निश्चित करेल ती क्षेत्रे. | १०० टक्के | १० |

## तक्ता-३

## सूक्ष्म, लघु व मध्यम औद्योगिक उपक्रम

| अ. क्र. (१) | वर्गवारी व क्षेत्र (२) | विद्युत शुल्क सूट टक्केवारी (३) | सक्षम कालावधी (वर्ष) (४) |
|---|---|---|---|
| १ | अ-मुंबई, मुंबई उपनगर जिल्हा, नवी मुंबई, ठाणे व पुणे महानगरपालिका आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्र. | ५० टक्के | ५ |

तक्ता-३ (चालू)

| (१) | (२) | (३) | (४) |
| --- | --- | --- | --- |
| २ | ब-इतर सर्व महानगरपालिका (वरील अनुक्रमांक १ मधील नोंदीत समाविष्ट असलेले क्षेत्र वगळून आणि सिंधुदुर्ग, औरंगाबाद व नागपूर हे विशेष पर्यटन जिल्हे आणि विशेष पर्यटन विभाग) आणि ' अ ' वर्ग महानगरपालिका. | ७५ टक्के | ५ |
| ३ | क-महाराष्ट्रातील सर्व जिल्हे (वरील अनुक्रमांक १ व २ मधील नोंदीत समाविष्ट असलेले क्षेत्र वगळून) आणि विशेष पर्यटन जिल्हे. | १०० टक्के | ७ |
| ४ | **विशेष पर्यटन क्षेत्र/विशेष पर्यटन जिल्हे**-सिंधुदुर्ग, औरंगाबाद व नागपूर हे जिल्हे तसेच पर्यटन विभाग निश्चित करेल ते क्षेत्र. | १०० टक्के | ७ |

वरील प्रमाणे विद्युत शुल्कामध्ये देय असलेली सूट शासन निर्णय क्रमांक टीडीएस.२०१५/११/सी.आर.१०२१/पर्यटन, दिनांक ४ मे २०१६ प्रमाणे सक्षम प्राधिकाऱ्याने संबंधित पात्र युनिटला पात्रता प्रमाणपत्र देण्यात आल्याच्या दिनांकापासून लागू होईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अ. मा. आत्राम,**
शासनाचे उप सचिव.

## INDUSTRIES, ENERGY AND LABOUR DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated the 6th January 2017

*NOTIFICATION*

MAHARASHTRA ELECTRICITY DUTY ACT, 2016.

No. ELD-2016/CR-16/Energy-1.—Whereas, the Government of Maharashtra, by the Government Resolution, Tourism and Cultural Affairs Department, No. TDS-2015/11/C.R.1021/ Tourism, dated the 4th May 2016 has declared the Maharashtra Tourism Policy-2016 (hereinafter referred to as "the said Tourism Policy") and under the said Tourism Policy, the Government of Maharashtra has offered certain incentives in the units specified in Para 5.6.13 of the said Tourism Policy ;

And whereas, the Government of Maharashtra considers it necessary, in the public interest, to exempt, the consumption of energy in respect of the class of premises used by the said Units, from the payment of the electricity duty payable under PART-B of the Schedule-A appended to the Maharashtra Electricity Duty Act, 2016 (XXVI of 2016) ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by section 4 of the Maharashtra Electricity Duty Act, 2016, the Government of Maharashtra hereby exempts the consumption of energy in respect of the class of Units covered in the Zones, according to Zone classification, mentioned in Maharashtra Tourism Policy, 2016, mentioned in column (2) of the Tables appended hereto, from the payment of the electricity duty payable under PART-B of the Schedule-A appended to the said Act, for the percentage and period mentioned against each of the said Units in columns (3) and (4) of the said Tables.

TABLE-I

Mega/Ultra Mega Projects

| Sr. No. (1) | Classification of Zone (2) | % of Electricity Duty Exemption (3) | Eligibility Period (in years) (4) |
|---|---|---|---|
| 1 | **A** - Mumbai, Mumbai Suburban District, Navi Mumbai, Thane and Pune Municipal Corporation and Pimpri Chinchwad Municipal Corporation Areas. | 50% | 10 |
| 2 | **B** - All Municipal Corporations (except areas mentioned in above serial No. 1 in and special tourism districts of Sindhudurg, Aurangabad and Nagpur and special tourism zones) and A Class Municipalities. | 75% | 10 |
| 3 | **C** - All districts of Maharashtra (except areas mentioned in above serial No. 1 and 2) and Special tourism districts. | 100% | 15 |
| 4 | **STZ/STD** - Districts of Sindhudurg, Aurangabad and Nagpur and High Potential Zones to be earmarked by DoT. | 100% | 15 |
| 5 | **Ultra Mega Project Unit** | 100% | 20 |

TABLE 2
Large Project

| Sr. No. (1) | Classification of Zone (2) | % of Electricity Duty Exemption (3) | Eligibility Period (in years) (4) |
|---|---|---|---|
| 1 | **A** - Mumbai, Mumbai Suburban District, Navi Mumbai, Thane and Pune Municipal Corporation and Pimpri Chinchwad Municipal Corporation Areas. | 50% | 7 |
| 2 | **B** - All Municipal Corporations (except areas mentioned in above serial No. 1 in and special tourism districts of Sindhudurg, Aurangabad and Nagpur and special tourism zones) and A Class Municipalities. | 75% | 7 |
| 3 | **C** - All districts of Maharashtra (except areas mentioned in above serial No. 1 and 2) and Special tourism districts. | 100% | 10 |
| 4 | **STZ/STD** - Districts of Sindhudurg, Aurangabad and Nagpur and High Potential Zones to be earmarked by DoT. | 100% | 10 |

TABLE-3
MSME Project

| Sr. No. (1) | Classification of Zone (2) | % of Electricity Duty Exemption (3) | Eligibility Period (in years) (4) |
|---|---|---|---|
| 1 | **A** - Mumbai, Mumbai Suburban District, Navi Mumbai, Thane and Pune Municipal Corporation and Pimpri Chinchwad Municipal Corporation Areas. | 50% | 5 |
| 2 | **B** - All Municipal Corporations (except areas mentioned in above serial No. 1 in and special tourism districts of Sindhudurg, Aurangabad and Nagpur and special tourism zones) and A Class Municipalities. | 75% | 5 |
| 3 | **C** - All districts of Maharashtra (except areas mentioned in above serial No. 1 and 2) and Special tourism districts. | 100% | 7 |
| 4 | **STZ/STD** - Districts of Sindhudurg, Aurangabad and Nagpur and High Potential Zones to be earmarked by DoT. | 100% | 7 |

Above mentioned Electricity Duty exemption shall be effective from the date of issue of the Eligibility Certificate to the concerned eligible unit by the Competent Authority as per the Government Resolution No. TDS-2015/11/C.R.1021/Tourism, dated 4th May 2016.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

A. M. ATRAM,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

पर्यटन धोरण -२०१६
राज्याच्या पर्यटन
धोरणानुसार पर्यटन
स्थळ म्हणून घोषित
घटकांची पाणीपट्टी
आकारणीबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः ग्रापापु-१११६/प्र.क्र.१२० /पापु-०७**
सातवा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय इमारत संकुल,
लोकमान्य टिळक मार्ग, मंत्रालय, मुंबई-४०० ००१.
तारीख: २१ डिसेंबर, २०१६

**वाचा :**

१) **शासन परिपत्रक क्रमांकः** पा.पु.व स्व.विभाग,शासन परिपत्रक क्र.ग्रापापु-१००७ /प्र.क्र.१७५ /पापु-०७ दिनांक ७.११.२००७

२) **शासन निर्णय क्रमांकः** पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय क्र. टीडीएस-२०१५/११ प्र.क्र.१०२१ / पर्यटन, दि. ४ मे, २०१६

**शासन परिपत्रक:**

राज्यातील पर्यटन व्यवसायाचा विकास करण्याच्या दृष्टिकोनातून शासनाने दिनांक ४ मे, २०१६ च्या शासन निर्णयान्वये राज्याचे पर्यटन धोरण-२०१६ घोषित केले आहे. या धोरणाच्या अनुषंगाने संबंधित प्रदेशातील पाणी पुरवठा योजनांच्या पाणीपट्टीच्या आकारणी संदर्भात क्षेत्रीय अधिका-यांना सूचना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

२. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या संदर्भीय दि. ४ मे, २०१६ च्या शासन निर्णयानुसार पर्यटन स्थळ म्हणून घोषित केलेल्या प्रदेशातील पात्र घटकांना विविध करांमधून सूट घोषित करण्यात आली आहे. तर, पिण्याच्या पाणी पुरवठया संदर्भात पाणीपट्टीची आकारणी जास्तीत जास्त औद्योगिक दराने करण्यात येईल. तसेच सिंधुदुर्ग, औरंगाबाद आणि नागपूर जिल्हयातील व अन्य क्षेत्रांसाठी पर्यटन क्षेत्रे म्हणून घोषित केलेल्या विशेष कार्यक्रमांतर्गत पाणीपट्टी व विद्युत शुल्क यामध्ये १० वर्षे कोणतीही वाढ होणार नाही. तथापि, अशा सेवांच्या कार्यान्विततेच्या खर्चात कोणतीही प्रत्यक्ष वाढ झाल्यास उपयोगकर्त्यांकडून पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार वसूली करण्यात येईल, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

श



३. ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या अंमलबजावणीसाठी शासनाने मागणी आधारित समूह सहभागाच्या पुरोगामी धोरणाचा स्विकार केलेला आहे. त्यानुसार ग्रामीण भागातील पाणी पुरवठा योजनांची मागणी, आखणी, अंमलबजावणी व देखभाल दुरुस्ती या सर्व बाबींची जबाबदारी प्रादेशिक योजनांच्या बाबतीत जिल्हा स्तरावर जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती व ग्रामस्तरावर ग्राम आरोग्य, पोषण, पाणी पुरवठा व स्वच्छता समितीकडे सोपविण्यात आली आहे. त्यानुसार पाणी पुरवठा योजना सुरवातीला कार्यान्वित होण्यासाठी योग्य ती पाणी पट्टी आकारणे, तीत वाढ करणे ही बाब संबंधित समित्यांच्या अखत्यारीत आहेत. शासनाने पाणीपट्टीचे किमान दर निश्चित केलेले आहेत, मात्र पाणीपट्टीत वाढ करण्याची कोणतीही मर्यादा घातलेली नाही.

४. या अनुषंगाने पर्यटन स्थळ म्हणून घोषित केलेल्या प्रदेशातील पर्यटन धोरणानुसार पात्र ठरलेल्या घटकांसाठी पाणीपट्टीची आकारणी करताना ती औद्योगिक दरापेक्षा जास्त नसावी. तसेच सिंधुदुर्ग, औरंगाबाद, नागपूर जिल्हा व अन्य क्षेत्रांसाठी पर्यटन क्षेत्रे म्हणून घोषित केलेल्या विशेष कार्यक्रमांतर्गत प्रदेशांसाठी पाणीपट्टीच्या दरात पुढील १० वर्षे वाढ करण्यात येऊ नये. मात्र, शासन धोरणाच्या अधिन राहून योजनेच्या कार्यान्वयन खर्चात झालेल्या प्रत्यक्ष वाढीच्या अनुषंगाने पाणी पट्टीच्या दरात वाढ करण्यात यावी.

५. पर्यटन धोरणाच्या अनुषंगाने पात्र घटकांना प्राथम्याने नळ जोडणी करुन देणे, किमान परिस्थितीत पाणी पुरवठा सुरळीत राहील याची काळजी घेणे, याकडे संबंधित क्षेत्रीय अधिका-यांनी विशेष लक्ष द्यावे.

६. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६१२२२१०३५०२२०२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Yashwant Tedgya Padvi

Digitally signed by Yashwant Tedgya Padvi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=WSSD, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=42f023d235c1f55c387492762e66530fd58085d2893f88445cf00fc7709a8080, serialNumber=c96ec3b84dfb89ca1fbee688d0dbc9e15c61e7e091602f1cc5c94657fc4d9c86, cn=Yashwant Tedgya Padvi
Date: 2016.12.22 15:48:13 +05'30'

**य.टे.पाडवी**
**उपसचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. विभागीय आयुक्त (सर्व)
२. सचिव (पर्यटन), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग,मंत्रालय, मुंबई.
३. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
४. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ लि., मुंबई

५. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
६. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
७. अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
८. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
९. प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
१०.प्रादेशिक उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (सर्व)
११.जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (सर्व)
१२.कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
१३.तहसीलदार (सर्व)
१४.गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व)
१५.पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने
१६.निवडनस्ती पापु-०७

**पर्यटन धोरण-२०१६ अंतर्गत शैक्षणिक सहलींचे आयोजन करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण २०१६/प्र.क्र.२६९-एस.डी.४**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
तारीख: २० मे, २०१७

संदर्भ : पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाचा क्र.टीडीएस-२०१५/११/प्र.क्र.१०२१-पर्यटन, दिनांक ०४ मे, २०१६ चा शासन निर्णय.

**प्रस्तावना :**

संदर्भाधीन शासन निर्णयान्वये राज्याचे पर्यटन धोरण निश्चित करण्यात आले असून राज्यातील पर्यटन धोरणाला चालना मिळण्यासाठी शालेय शिक्षण विभागांतर्गत शैक्षणिक सहलींचे आयोजन करावे अशी पर्यटन विभागातर्फे विनंती करण्यात आली आहे. त्यानुषंगाने शैक्षणिक सहलींच्या आयोजनाबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय:-**

राज्यातील सर्व माध्यमाच्या तसेच सर्व मंडळाशी संलग्नित शाळांतील इयत्ता ५ वी ते १० वी तील विद्यार्थ्यांना ऐतिहासिक विषयाचे ज्ञान मिळावे, भौगोलिक, सांस्कृतिक व शैक्षणिक गोष्टी प्रत्यक्ष पाहण्यास मिळाव्यात व त्यांची माहिती मिळावी यासाठी एका शैक्षणिक वर्षामध्ये एका शैक्षणिक सहलीचे अथवा ग्रामीण पर्यटनाचे (Educational Tour/Rural Tourism) आयोजन करण्यास या शासन निर्णयाद्वारे मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२. तथापि, अशा सहलीच्या आयोजनासाठी विद्यार्थ्यांवर कोणत्याही प्रकारची सक्ती करण्यात येऊ नये. सहलीमध्ये सहभागी होण्याकरीता संबंधित पालक व विद्यार्थ्यांची संमती असणे आवश्यक राहील.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०५२०१५००५८१३२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Suvarna S Kharat

Digitally signed by Suvarna S Kharat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School And Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8a98fe3e5a45c8186681 68cffd366aced9a44c59607f616a36d403a80e74d0df, cn=Suvarna S Kharat
Date: 2017.05.20 15:03:19 +05'30'

**( डॉ.सुवर्णा सि.खरात )**
सह सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१) मा.प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई,
२) मा.प्रधान सचिव, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई,
३) शिक्षण आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे,
४) मा.मुख्यमंत्री यांचे उपसचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई,

५) मा.मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा यांचे विशेष कार्य अधिकारी,
६) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे,
७) शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक, महाराष्ट्र राज्य, पुणे,
८) शिक्षण संचालक, प्राथमिक, महाराष्ट्र राज्य, पुणे,
९) विभागीय अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक, विभागीय मंडळे सर्व,
१०) राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई,
११) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
१२) प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, (सर्व),
१३) शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषद, (सर्व),
१४) सर्व गटशिक्षणाधिकारी
१५) सर्व शाळांचे मुख्याध्यापक गटशिक्षणाधिकारी यांचे मार्फत,
१६) निवड नस्ती एसडी-४.